20 Rs.

बीस रुपये

सत्यमेव जयते

भारत

INDIA

२०रू. TWENTY RUPEES 20Rs

TREASURY OFFICE
NASIK
28 MAR 2003
STPHC. ATO.

-7 APR 2003

विक्रीचे ठिकाण नासिक कोर्ट क्र. ...500... दि. ............ रु
स्टँप घेणाराचे नाव ... विजयकुमार विश्वनाथ धुरी ... रा. ..
हस्ते .................................................
सही......................................................

**दि. नाशिक डिस्ट्रीक्ट ॲडव्होकेटस् मल्टीपरपज को. ऑप. सोसायटी लि. नाशिक.** जिल्हा कोर्ट आवार, नाशिक. परिशिष्ट क्र.-क-२ (नियम १३ पहा) पावती क्र. 2635

दि. नासिक डिस्ट्रि. ॲडव्होकेटस् मल्टी. को-ऑप. सोसायटी लि. नासिक

परवाना क्रमांक : आस्था / जनरल / ८१/२१-२१-अ दि. ६/१०/१९८१ दि. 7/4/2003

श्री./श्रीमती विजय कुमार विश्वनाथ धुरी

राहणार नासिक

हस्ते श्री/श्रीमती

राहणार नासिक यांच्यासाठी रूपये (अक्षरी रूपये

मात्र) खाली नमुद केलेल्या मुद्रांक खरेदीसाठी रोख मिळाले.

| मु.वि.रजि. अ.क्र. | मुद्रांकाचा तपशिल | संख्या | किंमत रूपये |
|---|---|---|---|
| 500 | ५००० x<br>१००० x<br>५०० x<br>१०० x<br>५० x<br>२० x 1<br>१० x | 1 | 20 |
| | एकुण | 1 | 20 |

(मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही) (मुद्रांक विक्रेत्याची सही)

नसन-१.
3402/9196
२००३

साठेखत करारनामा दस्त क्रमांक 10053/ता. 24/12/2002नुसार खरेदीखत
मुल्यांकन तक्ता क्रमांक = 1.85, शासन किंमत रक्कम रुपये = 4,08000/-,
खरेदी किंमत रुपये = 4,08000/-, स्टॅम्प रक्कम रुपये = 32,640/-

॥ जय अंबे ॥

**फरोक्त खरेदीखत**

फरोक्त खरेदीखत आज तारीख 07 माहे एप्रिल ईसवी सन 2003 ते रोज ~~शनिवार~~ सोमवार ते दिवशी नाशिक मुक्कामी,

SEAL OF THE SUB-REGISTRAR
दुय्यम निबंधक नासिक-१ यांची मुद्रा
NASHIK-1

नसन-१.
३५०२/२१६
२००३

श्री. विजयकुमार विश्वनाथ घुगे,
उ.व. = 39, धंदा. = व्यापार व शेती,
राहा= विश्वकमल , स्वामी नारायण नगर,
नविन आडगांव नाका,पचंवटी नाशिक,
तालुका व जिल्हा नाशिक.

फरोक्त खरेदीखत लिहुन घेणार

यांसी

श्री. सुनिल ब्रिजलाल भुतडा,
उ.व. = 37, धंदा. = शेती व व्यापार,
राहा= शांती नगर , मु.पो. निफाड,
तालुका निफाड, जिल्हा नाशिक,

फरोक्त खरेदीखत लिहुन देणार

कारणे फरोक्त खरेदीखत लिहुन व नोंदवुन देतो ऐसा जे की,

1. **मिळकतीचे वर्णन =**

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगर पालीका हददीतील नाशिक शहरातील बिनशेती प्लॉटची मिळकत यांसी **सर्व्हे नं.267 /1 /1 /2 /3 पैकी प्लॉट नंबर 3 , यांसी क्षेत्र 627.00 चौरस मीटर, यांसी बिनशेती आकार रुपये 300.96 पैसे** , यांसी चतुःसिमा त्या खालीलप्रमाणे,

| | | | |
|---|---|---|---|
| **पुर्वेस** | = 6 मीटर कॉलनी रोड, | **पश्चिमेस** | = 30 मीटर डि.पी.रोड, |
| **दक्षिणेस** | = प्लॉट नंबर 2 , | **उत्तरेस** | = प्लॉट नंबर 4 , |

येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकतीवर सध्य स्थितीत असलेल्या ले आऊट प्रमाणे

SEAL OF THE SUB-REGISTRAR दुय्यम निबंधक नाशिक-१ यांची मुद्रा NASHIK-1

नसन-१.
३५९२/२०१६
२००३

रस्ते वापरण्याचे व मोकळया जागेचे वापर करण्याचे हक्कांसह मिळकत दरोबस्त.

सदरचे दस्तांमध्ये संक्षिप्तासाठी वर कलम 1 यांत वर्णन केलेल्या मिळकतीचा उल्लेख येथुन पुढे **सदरची मिळकत** असा केला आहे, लिहुन घेणार यांचा उल्लेख **तुम्ही** अंसा केला आहे, लिहुन देणार यांचा उल्लेख हा **मी / आम्ही** असा केला आहे.

2. सदरची मिळकतही माझी स्वंकष्टार्जित मालकीची असुन ,सदरच्या मिळकतीमध्ये माझे शिवाय इतर कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क व अधिकार नाही. तसेंच सदरची मिळकत ही मी मुळ मालक श्री. मोठाहरी लक्ष्मन झुरडे व इतर यांचे मार्फत जनरल मुखत्यार म्हणुन श्री. भास्कर लक्ष्मण जाधव यांचे कडुन कायमचे फरोक्त खरेदीने घेतलेली आहे. तसां दस्त में. दुय्यंम निबंधक साहेंब नाशिक यांचे कार्यालयांत दस्त क्रमांक 10615 / ता. 7 / 8 / 2001 रोजी नोंदविलेला आहे. त्यानुसार सदरची मिळकतही माझी कायदेशीर मालकीची आहे.

सदर मिळकतीचा मला पाहिजे तसा उपभोग घेण्याचा व विक्री विल्हेवाट लावण्याचा सपुंर्ण हक्कं व अधिकार आहे.

3. सदरची मिळकतही नाशिक महानगर पालिका नाशिक चे विकास आरखडयामध्ये रहिवाशी विभागात समाविष्ट केलेली आहे. त्यानुसार मुळ मालंक श्री. मोठाहरी झुरंडे व इतर यांनी सदर मिळकतीचा ले आऊट नाशिक महानगर पालिका नाशिक यांचे नगर रचना विभागाकडुन अंतिम रित्या तारिख 3 / 4 / 2001 रोजी जावक क्रं. / नगर रचना विभाग / अंतिम / 1 पचंवटी नुसार मजुंर करुन घेतलेला आहे ,तसेंच सदरची मिळकतही मुळ मालकांनी में. जिल्हाधिकारी साहेब नाशिक यांचे कडुन बिनशेती कारणांसाठी तारीख 26 / 6 / 2001 रोजी बिनशेती मध्ये रुपांतरीत करुन घेतलेली आहे तसा हुकुम में, जिल्हाधिकारी साहेंब नाशिक यांचे कार्यालयाकडुन बिनशेती प्र. क्रमांक / 45/2001 ता. 26 / 6 / 2001 नुसार दिलेला आहे.

सदची मिळकतही ना ज क म कायदा 1976 नुसार नाशिक अर्बन अॅग्लोमेरेशन चे हददीमध्ये समाविष्ट झालेली आहे त्यानुसार सदरची मिळकतही मुळ

SEAL OF THE SUB-REGISTRAR
दुय्यम निबंधक
नाशिक-१ यांची मुद्रा
NASHIK-1

नसन-१.
३५०२/०२
२००३

मालकांचे नावे ना ज क म कायदयाचे तरतुदी नुसार अनुज्ञेय / रिटेशन अशी घोषीत मेंअप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी साहेब ना ज क म नाशिक यांनी हुकुम केलेला आहे त्याहुकुमानुसार मी सदरची मिळकत रिटेंशन अशीच खरेदीने घेतलेली आहे. सदरची मिळकत ही माझे नावांने रिटेशंन अशीच आज पावेतो आहे.

4. सदरची मिळकत मला गैरसोयीची भासू लागली व व्यापारामध्ये मला आर्थिक अडचण निर्माण झाली व मी निफाड येथे स्थायीक झालेलो आहे . त्यामुळे सदर मिळकती मध्ये मला कोणत्याही स्वरुपाचे स्वारस्य राहीलेले नाही. त्यामुळे सदरची मिळकत मी विक्रीस काढली व तुम्हांस सदरची मिळकत पसंत पडल्यावरुन सदर मिळकती बाबत आपणां उभंतामध्ये फरोक्त खरेदी खताचा व्यवहार ठरलेला आहे. त्यानुसार मी तुमचे लांभात तारीख 24 / 12 / 2002 रोजी वरील मिळकती बाबत कायंम स्वरुपी खरेदी देण्याबाबतचा साठेखत कराननामा लिहून दिलेला आहे सदरचा साठेखत कराननामा में दुय्यंम निबंधक साहेब नाशिक 1 यांचे कार्यालयात दस्त क्रमाक 10053/ 2002 तारीख 24 / 12 / 2001 नुसार नोंदवुन दिलेला आहे. त्यानोंदविलेल्या साठेखत कराननाम्याची पुर्तता म्हणुन सदरचा दस्त मी तुमचे लाभांम लिहुन व नोंदवुन देत आहे.

5. सदरची मिळकत मी तुम्हांस पुर्वीच साठेखतांने कायमस्वरुपी देण्याबाबत कबुल केले होते त्यानुसार या दस्ताने सदरची मिळकत कायम स्वरुपी दिलेली आहे . तसेंच सदरची मिळकत आज पावेतो तुमचे शिवाय कोठेहीगहाण,दान,लिन,लिज,चार्ज,जप्ती,बक्षीसपत्र,मुर्त्युपत्र,अन्नवस्त्र, अथवा कोणत्याही लेखी अथवा तोंडी बोलीने करारानें गुंतवलेली नाही तसेंच सदरचे मिळकती बाबत कोणत्याही स्वरुपाचे वाद चालु नाही अथवा मिळकत हंस्तातरणाबाबत कोणत्याही में. कोर्टाने मनाई हुकम दिलेला नाही. तसेंच सदर मिळकत आज पावेतो मी कोणत्याही जडजोखंमीत गुंतवलेली नाही. तसेंच सदरची मिळकत शासनाने अथवा निमशासकिय संस्थेने ॲक्वायर अथवा रिक्वायर केलेली नाही. तश्या स्वरुपाच्या नोटीसा अदयाप पावेतो मला आलेल्या नाहीत. हे मी तुम्हांस विश्वासाने सांगुन व भरोशाने लिहुन देत आहे.

SEAL OF THE SUB-REGISTRAR
दुय्यम निबंधक
नाशिक-१ यांची मुद्रा
NASHIK-1

नसवर - १.
३५९२/५११६
२००३

यदाकदाचित सदर मिळकती बाबत कोणत्याही स्वरुपाचा वाद,हिल्ला,हरकत,जडजोखीम,अथवा सदर मिळकतीवर कोणत्याही स्वरुपाचा आर्थिक बोजा निघाल्यास त्या बाबीचे निवारण मी माझे पदर खर्चाने तुम्हांस करुन देईन त्याची तोषीस तुम्हांस लागुन देणार नाही.

6. सदर मिळकतीची **एकुण उक्ती किंमत रक्कम रुपये = 408,000/- अक्षरी रक्कम रुपये चार लाख आठ हजार मात्र ठरलेली आहे.** सदरची किंमत ही आजचे चालु बाजार भावाप्रमाणे योग्य व बरोबर असुन किंमती बाबत माझी कोणत्याही स्वरुपाची तक्रार नाही.

एकुण किमंतीचा भरणा तुम्ही मला या दस्ताचे अखेरच्या कलमा मध्ये नमुद केल्या प्रमाणे दिलेला आहे.

7. सदरची मिळकत या दस्तांने मी तुम्हांस निर्वेध बिन बोजाची अशीच ना ज क म कायदयाचे तरतुदी नुसार अनुज्ञेय असलेली मिळकत कायम स्वरुपी दिलेली आहे . त्यामुळे सदर मिळकती मध्ये माझा अथवा माझे मार्फत हक्कं व अधिकार सांगणा-या इंसमाचा कोणत्याही स्वरुपाचा हक्कं व अधिकार राहीलेला नाही त्यामुळे सदरचा दस्त माझे वर व माझे मार्फत हक्कं व अधिकार सांगणा-या इंसमांवर व माझया वालीवारंसावर बंधन कारक राहील.

8. सदर मिळकतीचे आज पावेतोचे सर्व कर, टॅक्सेस, बिनशेती सारा व मिळकतीचे अनुशंगाने असलेले नाशिक महानगर पालीकेचे डेव्हल्पमेंन्ट चार्जेस,तसेंच इन्कंमटॅक्स,गेनटॅक्स,कॅपीटल टॅक्स,मी संबधीत कार्यालयामध्ये रक्कमा भरुन दिलेल्या आहे. तसेंच यदाकंदाचीत या दस्तापुर्वीच्या कोणत्याही स्वरुपाच्या रक्कमा निघाल्यास त्या मी माझे पदर खर्चाने करुन देईल ,त्यांची तोषीस मी तुम्हांस लागुन देणार नाही.

9. सदर मिळकतही मी तुम्हांस कायम स्वरुपी दिलेली आहे त्यानुसार सदर मिळकती बाबत आपणा उभयंतामध्ये तारीख 24/12/2002रोजी साठेखत करारनाम्याचा दस्त झालेला आहे त्यानुसार साठेखत करारनामा दस्त करण्यापुर्वी मी तुम्हांस सदर मिळकतीचा निर्वेध असा कब्जा प्रत्यक्ष मिळकती मध्ये जावुन

SEAL OF THE SUB-REGISTRAR NASHIK-1 दुय्यम निबंधक नाशिक-१ यांची मुद्रा

नसन-१.
३५०२/६१६
२००३

मिळकतीचे हददीच्या निशाण्या दाखवून व सदर मिळकतीचे क्षेत्राचे मोज माप घेवुन दोन साक्षीदारंचे समक्ष कब्जा दिलेला आहे त्यानुसार आज रोजी खरेदी खता पुर्वी मिळकतीचा कब्जा तुम्हांस मालक म्हणुन कायम करुन दिलेला आहे. कब्जा बाबत उभयंतामध्ये कोणत्याही स्वरुपाचा वाद नाही.व सदरची मिळकत तुमचे कब्जा उपभोगात दिलेली आहे.

10. सदर मिळकतीचे तुम्ही कायम स्वरुपी मालक झालेले आहांत. त्यामुळे सदर मिळकतीचा उपभोग तुम्ही आज पासुन या दस्ताने तुम्हांस मन मानेल तसा भविष्यात घेत जावा यदाकदाचित भविष्यात तुमचे मालकी हक्कांस माझे मार्फत कोणीही कोणत्याही स्वरुपाचा हिल्लां हरकत निर्माण केल्यांस त्याचें निवारण मी माझे पदर खर्चाने करुन देईल त्याची तोषीस मी तुम्हांस लागुन देणार नाही.

11. सदरची मिळकत मी तुम्हांस या फरोक्त खरेदीखताने कायम स्वरुपी निर्वेध बिनबोजाची अशीच खरेदीने दिलेली आहे. त्यामुळे सदर मिळकत उलट परत घेण्याची तोडी अथवा लेखी बोली नाही त्यांच प्रमाणे सदरचा व्यवहार हा गहाणवटाचां नाही .

12. सदर मिळकतही ना ज क म कायदा 1976 चे तरतुदी नुसार नाशिक अर्बन ॲग्लोमोरेशन हददीमध्ये सामाविष्ट झालेली आहे. त्यामुळे सदरची मिळकत हस्तांतरणासाठी में. अप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्रधिकारी, ना ज क म नाशिक, यांचे कडुन ना ज क म कायदा कलंम 26 नुसार **परवानगी क्रंमाक यु. एल. सी. ए-2-2/एस आर-26/2035/2002 नाशिक तारीख - 20 / 12 / 2002** घेतलेली आहे . सदरची परवानगी या दस्तासोबत जोडलेली आहे.

13. सदर मिळकतीचे भोगवटयाकामी मी तुम्हांस मिळकतीचे **खरेदीखत ,7 / 12 उतांरा ,6/ड नोंदी ,ले आऊट नकाशा , ना ज क म परवानगी ,बिनशेती हुकुम** इत्यादी दिलेले आहेत.

14. सदर मिळकत मी तुम्हांस कायम स्वरुपी निर्वेध बिनबोज्याची अशीच या फरोक्त खरेदी खतांने दिलेली आहे. त्यामुळे तुम्ही या फरोक्त खरेदीखतांचे आधारे सदर मिळकतीच्या रेव्हेन्यु रेकॉर्डला मालकसदरी तुमचे नावाची नोंद करुन

SEAL OF THE SUB-REGISTRAR दुय्यम निबंधक नाशिक-१ यांची मुद्रा NASHIK-1

नसन-१.
३५८२/५१९
२००३

घ्यावी . सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डला तुमचे नाव लावण्यासाठी माझे मार्फत यदाकदाचित कोणत्याही स्वरुपाचा अर्ज ,जाब जबाब,प्रतिज्ञापत्र,इंडेमनिटी बॉंड, अथवा सही , समंती,अगर अन्य दस्त ऐवज करुन दयावी लागल्यास त्यासर्व कागद पत्राची पुर्तता मी तुम्हांस विना हरकत , विना मोबदला करुन देण्याचे मान्य व कबुल केले आहे.

15. सदर मिळकतीचे फरोक्त खरेदीखतासाठी आवश्यक असलेला सर्व खर्च जसें स्टॅम्प,लिहीणावळ,नोंदणावळ,इत्यादी सर्व खर्च तुमचे तुम्ही केलेला आहे व सोसलेला आहे.

16. वर कलम 6 मध्ये सदरचे मिळकतीची **एकुण किंमंत रक्कम रुपये 408,000/- अक्षरी रक्कम रुपये चार लाख आठ हजार मात्र ठरलेली आहे .** त्यानुसार एकुण किंमतीचा भरणा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना खालील प्रमाणे दिलेला आहे.

अ. ५१,०००/- अक्षरी एकावन हजार ता २४/12/02 रोजीचे साठेखतानुसार भरणा मिळाला आहे.

ब. ३००,०००/- अक्षरी तिन लाख ता ३/४/०३ बुसार H.D.F.C चे चेक नं. ३६०७६६ नुसार भरणा पावला.

क. ५७,०००/- अक्षरी सत्तावन हजार येवो वेळी रोख स्वरुपात मिळाले भरणा पावला

एकुण ४०८,०००/-

येणे प्रमाणे वर वर्णन केल्यानुसार सदर मिळकतीच्या एकुण किंमतीचा भरणा तुम्ही मला दिलेला आहे. भरणा पावला, त्या भरण्याबाबत व सदर मिळकतीच्या किंमती बाबत कोणत्याही स्वरुपांची तक्रार राहीलेली नाही.

येणे प्रमाणे सदरचे मिळकतीचे फरोक्त खरेदीखत आज रोजी मी दोन साक्षीदारां समक्ष माझे राजी खुषीने स्वंसंतोषाने लिहुन दिले आहे व में. दुय्यंम निबंधक साहेब नाशिक यांचे कार्यालयांत नोंदवुन दिलेले आहे,

हे फरोक्त खरेदीखत,

SEAL OF THE SUB-REGISTRAR दुय्यम निबंधक नाशिक-१ यांची मुद्रा NASHIK-1

नसन-१.
३५०२/२१९८
२००३

नाशिक,

तारीख - १९/ 04 /2003,

-------------------------------------

श्री. सुनिल ब्रिजलाल भुतडा,

(फरोक्त खरेदीखत लिहुन देणार)

-------------------------------------

श्री. विजयकुमार विश्वनाथ घुगे,

(फरोक्त खरेदीखत लिहुन घेणार)

**साक्षीदार**

1. ---------------------- पसंती ओबसे

2. ---- किरण ना. गांकिटे

SEAL OF THE SUB-REGISTRAR
दुय्यम निबंधक नासिक-१ यांची मुद्रा
NASHIK-1

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका कार्यालय,
जा. न. / नगररचना विभाग / अंतीम / ७ (पंचवटी)
दिनांक ३ / ४ / ~~१९९~~ २००१

प्रति. श्री. मोठाहरी लक्ष्मण झुरडे, अ. मु. श्री. भास्कर लक्ष्मण जाधव
द्वारा श्री. जी. व्ही. कटाळे, आर्कि. नाशिक

विषय:- नाशिक शिवारातील स. नं. / ~~सर्व्हे नं.~~ २६७/१/१/२ मोजणी नकाशाप्रमाणे व ७/१२ उताऱ्याप्रमाणेचे जागेतील प्लॉट नं. १ ते १० चा लेआऊट नकाशा अंतीम मंजूरी करणेबाबत.

संदर्भ:- तुमचा दिनांक ०३/०१/~~१९९~~ २००१ चा अर्ज व नकाशे.

नसनं - १.
३५९२ / ९४
2003

महाशय,

वरील संदर्भान्वये कळविण्यात येते की, नाशिक शिवारातील स. नं. २६७/१/१/२ मोजणी नकाशा प्रमाणे व ७/१२ च्या उताऱ्याप्रमाणे जागेतील नियोजित लेआऊटचा नकाशा तांत्रिक दृष्ट्या असल्याने त्यास इकडील जा. क्र. एल. एन. डी. / डब्ल्यू एस. / १५२/२७६५ — / — / दिनांक ०४/०८/१९९८ अन्वये टेंटटिव्हली मंजूरी शर्त नंबर १ ते १४ अनुसार मंजूरी देणत आली होती. त्यानंतर तुम्ही सदर शर्तीनुसार सदर नियोजित लेआऊट प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर मोजणी करून, प्लॉटस रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे कायमचे दगड रोवून सदर कॉलनी मध्ये कॉलनी रस्ते तयार करून दिले आहे त्याच प्रमाणे पाईप लाईन करीता रक्कम रुपये ८१,२४८=०० पावती क्र. / बुक क्र. ९२/००९ दिनांक ३० / ०३ / २००१ अन्वये या कार्यालयात भरलेली आहे.

सबब तुम्ही सदर नियोजित टेंटटिव्हली मजूर लेआऊटचे शर्तीनुसार योग्य ती पूर्तता केलेली असल्याने सदर जागेतील लेआऊटच्या नकाशास अंतिम मंजूरी (फायनल लेआऊट) खालील शर्तीवर देण्यात येत आहे.

– शर्ती –

१) सदर कॉलनीतले प्लॉट, रस्ते व खुली जागा यांचे हद्दीचे दगड हालवू नये व मंजूर लेआऊट प्रमाणे कोणतेही प्लॉटचे क्षेत्र जागेवर प्रत्यक्ष मोजले असता कमी अधिक भरता कामा नये.

२) मंजूर लेआऊट मधील कोणत्याही प्लॉटचा उपयोग फक्त राहणेसाठी करावा. अन्य कोणताही वापर या कार्यालयाची परवानगी घेतले शिवाय करू नये

३) मंजूर लेआऊट मधील कोणत्याही प्लॉटचे यापुढे उपविभाजन करणे किंवा एकत्रीकरण करणे झाल्यास इकडील पुर्व परवानगीशिवाय करू नये

४) मंजूर लेआऊटमधील प्लॉटमध्ये बांधकाम करणेपूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी (बांधकाम परवानगी) घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम करू नये.

५) सदर कॉलनी मध्ये तुम्ही पाण्याची लाईनसाठी रक्कम भरलेली आली तरी म. न. पा. ची सदर भागातील पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्याखेरीज पुर्ण कॉलनीत पाणी पुरवठा केला जाणार नाही.

६) मंजूर लेआऊट मधील रस्ते व खुल्या जागा नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात दिनांक ३०/०३/२००१ ह्या खुल्या जागेचे क्षेत्र · ४८७·८० चौ मीटर करारान्वये भरलेले आहे.

७) ... आणि पथदीपाची व्यवस्था विद्युत विभाग पथक / / / -- / दिनांक १६/०२/१९९९ अन्वये केलेली असून सुपरव्हिजन चार्जेस रक्कम ... २० ...०० पावती क्र २२ बुक क्रमांक ३८० दिनांक १६/१२/१९९८ ... भरलेली आहे

SEAL OF THE SUB-REGISTRAR NASHIK-1 दुय्यम निबंधक नाशिक-१ यांची मुद्रा

८) सदरहू अभिन्यास हा. ना. ज. क. म. कार्यालयाकडील पत्र क्र.
दिनांक ... च्या अधिन राहून देणेत येत आहे.

नसन-१.
३५८२/२०१६
२००३

वरील शर्ती नुसार सदरचे लेआऊट नकाशास अंतीम मंजूरी देणेत येत आहे. सोबत मंजूर लेआऊट नकाशाच्या प्रति जोडल्या आहेत.

सहाय्यक संचालक नगररचना,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत माहितीसाठी-
१) अध्यक्ष,
आर्की व इंजिनिअर्स असो.
नाशिक

२) अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
ना. ज. क. म. नाशिक

SEAL OF THE SUB-REGISTRAR
दुय्यम निबंधक
नासिक-१ यांची मुद्रा
NASHIK-1